9 JUN 2003

| प्रकल्प संचालक व अधीक्षक अभियंता खारभूमी विकास मंडळ, ठाणे. | |
|---|---|
| प्रकल्प संचालक व अधीक्षक अभियंता | 9/6 |
| सहाय्यक अधीक्षक अभियंता | |
| अधीक्षक | |
| शाखा | (५२१-३) |
| आवक क्रमांक | |
| दिनांक | १०-६-२००३ |

**खारभूमि विकास योजनांच्या व्यवस्थापनात शेतकऱ्यांचा सहभाग अनिवार्य करणे व खारभूमि योजनांमुळे लाभ होणाऱ्या शेतकऱ्यांच्या / लाभार्थींच्या सहकारी संस्था स्थापन करुन खारभूमि विकास योजना व्यवस्थापनासाठी सदर संस्थांकडे हस्तांतरित करणे.**

महाराष्ट्र शासन
पाटबंधारे विभाग
शासन निर्णय क्र. खाभूयो-२००१/(५२१/२००१)/खारभूमि
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २८ मे, २००३

पहावे:- महाराष्ट्र खार जमिनी विकास अधिनियम, १९७९.

प्रस्तावना :-

१. महाराष्ट्र राज्याच्या ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या समुद्र किनारा लाभलेल्या चार जिल्ह्यातील किनाऱ्यालगतच्या जमिनी शेकडो वर्षापासून काही खाजगी योजना राबवून त्यांचे व्यवस्थापन संबंधित लाभार्थींनी स्वत:च केलेले आढळते. सन १९४८ मध्ये खारभूमि विकास मंडळ (बोर्ड) अस्तित्वात आले व सदर मंडळाने काही खारभूमि विकास योजनांचे बांधकाम पूर्ण करुन त्यांचे व्यवस्थापनही केले. तदनंतर खारभूमि विकास योजनांची कामे महाराष्ट्र खार जमिनी विकास अधिनियम, १९७९ मधील तरतुदींनुसार राज्याच्या पाटबंधारे विभागाकडे सोपविण्यात आली. अधिनियमातील खंड ३ मधील तरतुदींनुसार खारजमिनींचे अत्यंत कार्यक्षम व किफायतशीर रितीने संरक्षण करणे, त्यांचा विकास करणे, त्या सुस्थितीत ठेवणे व त्यांचे नियंत्रण करणे ही कर्तव्ये पार पाडण्याची जबाबदारी राज्य शासनावर येऊन पडली. उपरोक्त अधिनियमातील तरतुदींनुसार सध्या खारभूमि विकास योजनांतर्गत पुन:प्रापित झालेल्या क्षेत्राचे व्यवस्थापन राज्याच्या पाटबंधारे विभागाकडून करण्यात येत आहे.

२. शासनातर्फे पूर्ण करण्यात आलेल्या विकास योजनांची कामे संबंधित लाभार्थींकडे दुरुस्ती, देखभाल व व्यवस्थापनासाठी हस्तांतरित करण्याची संकल्पना मूळ धरु लागलेली आहे. पाटबंधारे प्रकल्पांच्या व्यवस्थापनात शेतकऱ्यांचा सहभाग घेण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांनी सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करण्यासंदर्भात यापूर्वीच शासनातर्फे काही मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली आहेत व त्यानुसार आदेशही निर्गमित करण्यात आले आहेत.

३. खारभूमि विकास टप्पा-१ च्या कामास आर्थिक मदत देतांना खारभूमि विकास योजनांच्या कामात, आराखडा तयार करण्यापासून लाभधारकांचा सहभाग असावा व पूर्ण झालेल्या खारभूमि विकास योजनांचे व्यवस्थापन संबंधित लाभधारकांकडून करण्यात यावे, अशा प्रकारची आग्रही सूचना युरोपियन आर्थिक समुदायाकडून करण्यात आली होती. युरोपियन आर्थिक समुदायाकडून सध्या खारभूमि विकास कार्यक्रम टप्पा-२ संदर्भातही वरीलप्रमाणेच आग्रह धरण्यात आलेला दिसतो.

D:\Kunda\Brief...

४. व्यापकपणे विचार केल्यास शासनाने पूर्ण केलेल्या विविध विकास योजनांचे व्यवस्थापन संबंधित लाभधारकांकडून करण्यात यावे अशा प्रकारची संकल्पना जगभर स्वीकृत करण्यात आल्याचे दिसून येते. सन १९४८ पूर्वी जरी खाजगी खारभूमि योजनांचे बांधकाम, दुरुस्ती व देखभाल तसेच व्यवस्थापन इत्यादी कामे संबंधित लाभधारकांकडून करण्यात येत असली तरी नंतरच्या काळात तसे करणे संबंधितांना शक्य होत नसल्याने पूर्ण झालेल्या खाजगी खारभूमि विकास योजनांची कामे दुरुस्ती व देखभालीसाठी शासनाने ताब्यात घ्यावीत अशा प्रकारचाही विचारप्रवाह सुरु असल्याचे दिसून येते. तथापि, खारभूमि विकास योजनांची देखभाल व दुरुस्तीची कामे संबंधित लाभार्थींनी करणे योग्य असल्याचे दिसून येते. कारण खारभूमि विकास योजनांमुळे पुन:प्रापित होणारे क्षेत्र फार मोठे नसते. तसेच अशा योजनांच्या व्यवस्थापनात केवळ मातीचा बांध, उघाड्या व इतर बांधकामे यांच्या दुरुस्ती देखभालींचा प्रश्न उद्भवत असतो. पाणी वापरणाऱ्यांच्या सहकारी संस्थाप्रमाणे पाणी मोजून घेणे व त्याचे मोजून वाटप करणे, संबंधितांकडून पाणीपट्टी वसूल करणे अशा प्रकारची विविध कामे व्यवस्थापनात समाविष्ट नसतात. त्यामुळे खारभूमि विकास योजनांची दुरुस्ती व देखभालीची कामे संबंधित लाभार्थींना त्यांच्या सहकारी संस्था स्थापन करणे अनिवार्य करुन, अशा संस्थांकडे योजना सुपूर्द करणे योग्य होईल.

५. वरील पार्श्वभूमि लक्षात घेऊन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत.

**शासन निर्णय :-**

खारभूमि विकास योजनांच्या व्यवस्थापनात संबंधित लाभधारकांचा सहभाग अनिवार्य करणे व संबंधित लाभार्थींच्या सहकारी संस्था स्थापन करुन अशा योजना संबंधित संस्थांकडे व्यवस्थापनाकरिता (दुरुस्ती व देखभालीसह) हस्तांतरित करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. अशाप्रकारचे हस्तांतरण करण्यासाठी पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात येत आहेत.

(१) लाभार्थींच्या सहकारी संस्थांना पूर्ण झालेल्या खारभूमि विकास योजनांचे व्यवस्थापन हस्तांतरित करण्याकरिता करारनामा तयार करण्यात यावा. विहीत करारनाम्याचे प्रारुप सदर शासन निर्णयाबरोबर जोडण्यात आले आहे.

(२) करारनामा विहीत कालावधीपुरता मर्यादित ठेवण्यात यावा. सुरुवातीस करारनाम्याचा कालावधी ५ वर्षे असावा.

(३) लाभार्थींच्या संस्थेकडे खारभूमि विकास योजना देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनासाठी देण्यात येणार असल्याने योजनांतर्गत असलेल्या मातीचा बांध, उघाड्या व इतर बांधकामे व त्यासाठी संपादित केलेली जमीन इत्यादींचा मालकी हक्क शासनाकडे राहील.

झाल्यापासून पाच वर्षानंतर देखभाल व दुरुस्तीसाठी शासनातर्फे निधी दिला जाणार नाही. लाभार्थी संस्थांना संबंधित योजनेची देखभाल व दुरुस्ती करावी लागेल.

(१३) समयोचित देखभाल व दुरुस्ती संदर्भात खारभूमि विकास योजनेशी संबंधित असलेले कार्यकारी अभियंता यांचा निर्णय अंतिम असेल. या संदर्भात काही मतभेद झाल्यास अधीक्षक अभियंता, खारभूमि विकास मंडळ, ठाणे यांचा निर्णय अंतिम समजण्यात यावा व तो शासन तसेच सहकारी संस्था यांच्यावर बंधनकारक म्हणून स्विकारण्यात यावा.

(१४) खारभूमि विकास योजनेच्या बांधाची, उघाड्यांची व इतर बांधकामाची समयोचित दुरुस्ती करुन योजना सुस्थितीत ठेवणे व भरतीचे खारे पाणी शेतजमिनीत शिरुन जमीन नापिक होण्याच्या धोक्यास प्रतिबंध करणे, त्यायोगे पुन:प्रापित क्षेत्रात जास्तीत जास्त धान्य/कृषि उत्पादन करणे इत्यादी उद्दिष्टे प्रभावीपणे साध्य करता यावीत यासाठी संबंधित सहकारी संस्थेस पुढीलप्रमाणे विशेष सवलती, संस्थेने मागणी केल्यास, मिळू शकतील.

(अ) अशा संस्थेस उत्तेजनार्थ केंद्र शासनाकडून, युरोपियन आर्थिक समुदायाकडून अथवा इतर मार्गाने अनुदान सवलतीस प्राधान्य मिळणार असल्यास ते उपलब्ध करुन देण्यास मदत करण्यात येईल.

(ब) नैसर्गिक आपत्तीमुळे मोठी / विशेष दुरुस्ती करण्याची पाळी आल्यास तसेच उघाड्यांच्या झडपा बदलणे अथवा योजनेचे नूतनीकरण करणे आवश्यक असल्यास संबंधित कार्यकारी अभियंता यांना संस्थेकडून पाचारण करण्यात येईल व कार्यकारी अभियंता यांनी पाहणी केल्यानंतर आवश्यक ती विशेष दुरुस्ती / नूतनीकरण इत्यादी कामे शासकीय खर्चाने करण्यात येतील.

(क) नैसर्गिक कारणांमुळे करावी लागणारी नैमित्तिक लहान स्वरुपांची दुरुस्ती संस्थेने तत्परतेने पूर्ण करावी. अन्यथा लहान दुरुस्तींचे रुपांतर कालांतराने मोठ्या दुरुस्तीत झाल्यास त्याबाबतची जबाबदारी संबंधित सहकारी संस्थेची राहील. या संदर्भात देखील संबंधित कार्यकारी अभियंता यांचा निर्णय अंतिम समजण्यात यावा.

(१५) सहकारी संस्था पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्यासाठी समन्वयाचे काम मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, कोकण प्रदेश, मुंबई यांनी पहावे. संस्थेच्या कार्यकारी समितीवर शासनाचा एक प्रतिनिधी पदसिध्द मानस सभासद म्हणून राहील व त्याची नेमणूक मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, कोकण प्रदेश, मुंबई यांच्याकडून करण्यात येईल. संस्थेकडून उपकर वसूल करण्याची जबाबदारी या शासकीय प्रतिनिधीची राहील व ही बाब उपरोक्त (९) व (१०) शी सुसंगत राहील.

(१६) खारभूमि विकास योजनांच्या व्यवस्थापनात संबंधित लाभार्थींचा सहभाग अनिवार्य ठरविण्यासाठी व लाभार्थींच्या सहकारी संस्थांना पूर्ण झालेल्या खारभूमि विकास योजना देखभाल व

(४) लाभार्थींच्या संस्थेच्या कार्यक्षेत्रातील एखाद्या समासदाने जमिनीची विक्री केल्यास अथवा मालमत्तेचे हस्तांतरण केल्यास त्याचे समासदत्व आपोआपच रद्द होईल व नवीन मालक संस्थेचा समासद होण्यास पात्र ठरेल.

(५) खारभूमि विकास योजनांमुळे लाभ मिळालेल्या किंवा संरक्षित करावयाच्या जमिनी, तसेच जमिनीच्या मालकांची, भोगवटादारांची व धारकांच्या नावांची यादी तयार करण्याचे काम लाभार्थींच्या संस्थेने करावे.

(६) पुन:प्रापित केलेल्या जमिनीत चांगली लागवड करण्यासंबंधात सर्व कामांवर संस्थेने देखरेख ठेवावी.

(७) पुन:प्रापित केलेल्या खारजमिनींवर सिंचनविषयक सोयींची तरतूद होण्याच्या दृष्टीने संस्थेने विचारविनिमय करुन सर्वकष प्रस्ताव तयार करावा. याबाबतीत संबंधित कार्यकारी अभियंता यांचे सहाय्य घेण्यास हरकत नाही.

(८) मातीच्या बांधाची हानी होण्यास कारणीभूत होणाऱ्या विवक्षित प्राण्यांचा धोका व उपद्रव यांचे नियंत्रण करण्याचे काम संस्थेने करावे.

(९) खारजमिनींच्या संबंधातील योजनांची अंमलबजावणी व त्यावरील सर्वसाधारण दुरुस्ती, देखभाल व देखरेख यांवरील खर्चाचा हिस्सा भागविण्याच्या दृष्टीने खारजमिनींच्या संबंधातील शासनाने लागू केलेले उपकर संबंधित लाभार्थींकडून प्रतीवर्षी गोळा करण्याची जबाबदारी सहकारी संस्थेची राहील.

(१०) उपकरांची रक्कम वसूल करुन ती नजिकच्या कोषागारात अथवा संबंधित खारभूमि विकास अधिकाऱ्यांकडे जमा करण्यात यावी.

(११) लाभार्थींच्या सहकारी संस्थांबरोबर करारनामा केल्यानंतर योजनेच्या बांधाचे, उघाड्यांचे व इतर बांधकामांचे संयुक्तपणे निरिक्षण, संस्थेचे समासद व खारभूमि विकास अधिकारी यांचेमार्फत करण्यात यावे. पाहणीत आढळून आलेल्या व आवश्यक असणाऱ्या विहीत सुधारणा व दुरुस्त्या शासकीय खर्चाने करण्यात याव्यात. आवश्यक त्या दुरुस्त्या झाल्यानंतर व योजना सुस्थितीत आल्यानंतर योजनेची संयुक्तपणे पाहणी करण्यात यावी. संस्थेचे समाधान झाल्यानंतर संबंधीत खारभूमि विकास योजना संस्थेकडे हस्तांतरित करण्यात यावी.

(१२) खारभूमि विकास योजनांतर्गत असलेल्या मातीच्या बांधाची, उघाड्यांची व इतर बांधकामाची सर्वसमयोचित देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित सहकारी संस्थेची राहील. शासनातर्फे दरवर्षी मापदंडानुसार या कामांसाठी जितकी रक्कम लागेल तेवढी अथवा प्रत्यक्ष दुरुस्तीसाठी खर्च केली गेलेली रक्कम, यापैकी जी कमी असेल तेवढी रक्कम संबंधित सहकारी संस्थेस अनुदान म्हणून देण्यात येईल. : अनुदानाच्या रकमेबाबत दर ३ वर्षांनी फेरविचार करण्यात येईल. योजना कार्यान्वीत

दुरुस्तींसाठी तरतूद देण्याच्या अनुषंगाने विद्यमान महाराष्ट्र खार जमिनी विकास अधिनियम, १९७९ मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या स्वतंत्रपणे करण्यात याव्यात.

(१७) करारनाम्याची सुरुवातीची मुदत ५ वर्षांची राहील व त्यानंतर करारनामा पुढे चालू ठेवावयाचा किंवा कसे ही बाब दोन्ही पक्षांच्या संमतीने व सहमतीने ठरविण्यात येईल.

हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या दिनांक २८/८/०२ च्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १५९/१४३२, वित्त विभागाच्या दिनांक ७/४/२००३ चा अनौपचारिक संदर्भ क्रमांक २९८/व्यय-१२ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(आ. सो. लोंढे)
शासनाचे उप सचिव

सहपत्र :- करारनाम्याचे प्रारुप

प्रत सहपत्रासह :-

मा. राज्यपालांचे सचिव, महाराष्ट्र राज्य (मुंबई)
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (पा.) (कोकण व कृष्णा खोरे महामंडळे वगळून) पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (पा.) (कोकण व कृष्णा खोरे महामंडळे वगळून) पाटबंधारे विभाग,मंत्रालय,मुंबई.
मा. मंत्री (जलसंधारण व खारजमिनी), मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (खारजमिनी), पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (पा.), (कोंकण व कृष्णा खोरे महामंडळे), पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई..
मा. राज्यमंत्री (पा.), (कोंकण व कृष्णा खोरे महामंडळे), पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई.
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
मुख्य अभियंता (बासप्र) व सह सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई.
मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, कोकण प्रदेश, मुंबई.
अधीक्षक अभियंता, खारभूमि विकास मंडळ, ठाणे
विभागीय आयुक्त, कोकण प्रदेश, मुंबई.
खारभूमि विकास मंडळ, ठाणे यांच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यकारी अभियंता
जिल्हाधिकारी ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर.
उप सचिव (ल.पा.)/अ.स.(खारभूमि)/ उप अभियंता (खारभूमि),पाटबंधारे विभाग,मंत्रालय, मुंबई.
खारभूमि कार्यासन (संग्रहार्थ)

D:\Kunda\Brief note.doc